प्रकरण : । ले

# मराठी ग्रामीण कथा : उदय आणि विकास

पृष्ठ क्रमांक 4 ते 26

## प्रकरण : 1

## मराठी ग्रामीण कथा : उदय आणि विकास

सामान्यतः 1945 नंतर मराठी साहित्यात नागर आणि ग्रामीण असा स्पष्ट भेद जाणवू लागला. ग्रामीण वाङ्मय आपली खास वैशिष्ट्ये घेऊन या सुमारास प्रकट होऊ लागले. या काळातील ग्रामीण साहित्याचा धागा अगदी हरिभाऊ आपटे यांच्यापर्यंत नेऊन भिडवता आला तरी हरिभाऊंच्या काळात ग्रामीण साहित्याची वेगळी प्रेरणा दिसत नाही. 1920 च्या दरम्यान राजकीय परिस्थितीत झालेल्या स्थित्यंतराचा परिणाम सामाजिकदृष्टीवरही झाला. कोणतीही चळवळ करावयाची तर समग्र समाजाचा जागृतीपूर्ण सहभाग असणे अगत्याचे आहे हे महात्मा गांधीजींनी जाणले होते. केवळ पांढरपेशा वर्गात चाललेली चळवळ पुरेशी पडणार नाही. भारत हा खेडयांचा देश आहे. ग्रामीण जीवन हे महत्वाचे आहे. तिथला माणूस मनःपूतपणे चळवळीत आला पाहिजे म्हणून महात्मा गांधीजींनी "खेडयाकडे चला" हा मूलमंत्र आपल्या कार्यकर्त्यांना दिला. त्याचा परिणाम असा झाला की हा दूरवर पसरलेला प्रदेश होता, त्याकडे सर्व दृष्टींनी लक्ष वेधले गेले. ग्रामीण माणसाकडे एक शक्ती म्हणून पाहण्यात आले. त्याला सूज्ञ, जागृत, सुबोधित करण्याकडे कल झुकू लागला. आतापर्यंत अस्पर्शित असलेले ग्रामीण जीवन साहित्याच्या कक्षेत आले. 1925 ते 1940 या काळातच ग्रामीण वाङ्मय, प्रादेशिक साहित्य हे शब्दप्रयोग मराठी साहित्यात येऊ लागले. गांधीवादाबरोबरच साम्यवादाचाही प्रभाव या काळावर होता. देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम यातून निर्माण झालेल्या ध्येयवादाचीही धारणा होती. त्याचा प्रभाव मराठी साहित्यावर पडला. ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, तिथल्या श्रध्दा, रीती, परंपरा, तिथला बहुरंगी निसर्ग याचे चित्रण मराठी साहित्यात प्रथमच येऊ लागले.

**मराठी ग्रामीण कथा :**

ग्रामीण कथा ही मुळात इतर कथांप्रमाणे कथा असायला हवी. कथावाङ्‌मयाच्या निकषांच्या आधारावर तिचे मूल्य निश्चित झाल्यावर "ग्रामीण" या विशेषणाचा विचार होतो. ही ग्रामजीवनातील अनुभूती व्यक्त करते म्हणून तिला "ग्रामीण कथा" म्हणायचे. ग्रामीण साहित्याचे समीक्षक व प्रसिध्द ग्रामीण कथाकार प्रा. आनंद यादव यांनी ग्रामीण कथेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे - "ग्रामीण कथेचा कलेच्या दृष्टीने वेगळा असा प्रकार नाही. इतर कथांप्रमाणेच ती एक कथा आहे. "ग्रामीण" हे तिचे विशेषण आहे. खेडयातील म्हणजे ग्रामातील जीवनाची अनुभूती म्हणून ती काही खास वेगळी नाही. असे असले तरी खेडेगाव, तेथील जीवनपध्दती, तेथील भाषा, रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेली प्रादेशिक वैशिष्ठये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्टये त्या कथेत येतात. ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते. तिचे ग्रामीणत्व या व इतर अनेक कारणांनी डोळयात भरते. तो अनुभूतीचा अपरिहार्य घटक म्हणून येऊ लागतो व ती कथा "ग्रामीण" होते. कलेचा कलाप्रकार म्हणून ती वेगळी नसली तरी वैशिष्टयपूर्णतेमुळे प्रकार म्हणून ती लक्षात येते."[1]

या प्रदीर्घ व्याख्येतून ग्रामीण कथेची वैशिष्टये नेमकेपणाने स्पष्ट झाली आहेत. ग्रामीण कथेत सर्वाधिक महत्व आहे ते ग्रामीणत्व किंवा ग्रामीण अनुभूतीला. ग्रामीणत्व नसेल तर कथा ग्रामीण होऊच शकणार नाही. म्हणजेच "ग्रामीणत्व" हा ग्रामीण कथेचा प्राण आहे. ग्रामीण कथालेखक शहरात राहणारा असो किंवा खेडयात राहणारा असो, तो जो अनुभव कथेतून व्यक्त करतो तो अनुभव ग्रामीण जीवनातील हवा. केवळ ग्रामीण भाषेतील पण नागर अनुभवाची कथा "ग्रामीण कथा" होऊ शकणार नाही. तिला ग्रामीण मातीचा सुगंध हवा, ग्रामीण मातीतून ती जन्माला यायला हवी. ग्रामीण रुढी, परंपरा, रीतीरिवाज, समजुती, संस्कृती, राहणीमान, समस्या, सुख-दुःखे, भावभावना इत्यादींनी ती नियत व्हायला हवी. ग्रामीण मनाचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडणे अपरिहार्यच आहे. अस्सल ग्रामीण कथा व्हायची असेल तर ती अस्सल ग्रामीण जीवनावरच आधारलेली असली पाहिजे. केवळ वरवरचे ग्रामीण तपशील त्यात भरुन ती चांगली ग्रामीण कथा होऊ शकणार नाही. अनुभव घेण्याची व प्रकटीकरणाची वैशिष्टयपूर्ण रीत म्हणजे "संवेदनशीलता" होय. ज्या वातावरणात लेखक वाढतो त्याचे काही संस्कार त्याच्यावर होतात. त्याची लेखक म्हणून जडणघडण या संस्कारावरच होत असते. हे संस्कार जितके अस्सल तितका तो लेखक सामर्थ्यवान ठरत असतो.

ग्रामीण कथेतून ज्या ग्रामीण जीवनाचे अनुभव व्यक्त केले जातात, त्या जीवनाचे भौगोलिक संदर्भ हे शहरी जीवनाची संस्कृती, परंपरा यापेक्षा काही प्रमाणात वेगळे असतात. त्यामुळे "ग्रामीण" हे विशेषण काही केवळ अभिव्यक्तीचे किंवा तंत्राचे वैशिष्ट्य दाखवित नसते तर या विशेषणामुळे साहित्य क्षेत्रात भौगोलिक संदर्भ, साहित्यपरंपरा संदर्भ, भाषिक संदर्भ, कृषिप्रधान-जीवन संदर्भ निर्दिष्ट केले जातात. केवळ शहरी वातावरणातील कथा आणि ग्रामीण वातावरणातील कथा एवढाच ढोबळ भौगोलिक फरक येथे ठरत नाही. तर त्यापेक्षाही अधिक काही या कथेतून व्यक्त व्हावे ही अपेक्षा असते, हे जे व्यक्त होते त्यातून ग्रामीण कथेचे विशेष प्रकट होतात.

**ग्रामीण कथा : उदय आणि विकास :**

**हरिभाऊ आपटे :-** आज आपणाला ग्रामीण जीवनाचे अनेकांगी दर्शन घडविणारी जी ग्रामीणकथा दिसते, तिच्या उगमाकडे जाताना हरिभाऊ आपटे यांच्या "काळ तर मोठा कठीण आला" या कथेपाशी येऊन थांबावे लागते. 1897 मध्ये महाराष्ट्रात जो भयानक दुष्काळ पडला त्याची वृत्ते डेक्कन सभेच्या कागदपत्रांमध्ये हरिभाऊंना वाचायला मिळाली. त्यावरच "काळ तर मोठा कठीण आला" ही कथा लिहिली. हरिभाऊंना ग्रामीण जीवनाचा अनुभव नव्हता. पण तरीही शेतक-याच्या जीवनाची दुर्दशा त्यांनी रंगविली. मानवी जीवनाची झालेली वाताहत पाहून त्या करुणेपोटी हरिभाऊनी ही कथा लिहिली. पांढरपेशी जीवनावर लिहिलेल्या कथांप्रमाणेच या कथेमागेही त्यांच्या लेखनाची प्रेरणा होती. खास करुन ग्रामीण जीवन जगणा-या शेतक-यांच्या जीवनानुभवावर ही कथा लिहिलेली नाही. दुष्काळाने शेतक-यांची वाताहत कशी झाली त्याचेच चित्र त्यांनी रेखाटले आहे. ग्रामीण प्रदेश, ग्रामीण जीवन, ग्रामीण वातावरण, ग्रामीण माणूस रंगवावयाचा या हेतूने त्यांच्या हातून ही कथा लिहिली गेली नाही. ग्रामीण जीवनाचे चित्रण आपल्या कथातून चित्रित करावयाचे आहे अशी त्यांची भूमिका नव्हती. "ही स्फुट गोष्ट एक वाङ.मयीन अपघात वाटते. ग्रामीण जीवनाच्या खास जाणिवा घेऊन ती जन्माला आलेली नाही. केवळ आज ग्रामीण वाङ्.मयाच्या विपुलतेमुळे, त्याच्या जन्माचा शोध घेत घेत भूतकाळात जाताना ती एक खूण दिसते एवढेच."[2] तरीदेखील ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारी ही कथा आद्य मराठी ग्रामीण कथा मानण्यास हरकत नाही. या संदर्भात चंद्रकुमार नलगे म्हणतात, "ग्रामीण मराठी कथेची पायरीखालची पायरी असे तिचे दर्शन आहे. तरीही तिचे महत्व नामदेवाच्या पायरीप्रमाणे आहे हे मानावेच लागेल."[3]

**वि. स. सुखठणकर :-** 1920 नंतर गांधीजीच्या विचारांचा प्रभाव वाढत गेला. आतापर्यंत अस्पर्शित असलेले ग्रामीण जीवन साहित्याच्या कथेत आले. याच काळात गोव्यातील लेखक वि.स.

सुखठणकर यांचा "सहयाद्रीच्या पायथ्याशी" हा आठ प्रादेशिक कथांचा संग्रह 1931 साली प्रसिध्द झाला. या कथांतून गोमंतकाचा प्रदेश आणि तेथील खेडी जिवंत झाली. खेडयातील माणसे, त्यांचे प्रश्न, वैर, ईर्षा, देवदासी प्रथा, हेवेदावे या सर्वांचे वर्णन पाहायला मिळते. तसेच ख्रिस्ती आणि हिंदू यांच्यातील निर्माण झालेले तणाव, शेतकरी आणि जमीनदारांच्या कुरकुरी अशा अनेक प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचे काम सुखठणकरांनी केले. "कथेतील योगायोगांची गर्दी, कधी आदर्शांच्या आत्यंतिक टोकाचे चित्रण या कथेत येत असले तरीही ग्रामीण जीवनाचा सांगाडा त्यात सापडतो आणि माणसांच्या प्रवृत्ती कळतात."[4] समाजदर्शनापेक्षाही समाजप्रबोधन हेच सुखठणकरांना अभिप्रेत होते असे दिसते. ग्रामीण प्रादेशिक जीवनाची व्यापक जाणीव इथे आहे हे चट्कन ध्यानात येते. ग्रामीण जीवनाचे वाड्.मयीन भान या कथांना लाभले आहे हे जाणवते.

**श्री. म. माटे :-** 1941 साली श्री.म. माटे यांचा "उपेक्षितांचे अंतरंग" हा संग्रह प्रसिध्द झाला आणि मराठी ग्रामीण कथेला नवे घुमारे फुटले, नव्या जाणिवा पालविल्या. या संग्रहामुळे ज्याचे चित्रण अजून मराठी साहित्यात व्हायचे आहे, असा फार मोठा भाग शिल्लक आहे याची जाणीव ललित लेखकाला झाली. माटयांनी आपल्या कणखर मराठमोळया शब्दांनी रांगडया ग्रामीण व्यक्तिरेखा निर्माण केल्या. ग्रामीण लोकांची भाषा, समाजसुधारकांची कणव, पांढरपेशाची जाणीव या सर्वांचा मनोहारी मिलाफ त्यांच्या कथेत पाहावयास मिळतो. "उपेक्षितांचे अंतरंग" आणि "माणुसकीचा गहिवर" या दोन कथासंग्रहाच्या नावावरुन त्यांच्या कथांची नस आपल्याला कळते. दलितांत, उपेक्षितांत, समाजातील खालच्या थरात मिसळून त्यांचे जीवन, त्यांची सुख-दु:खे, त्यांचे दारिद्रय, त्यांच्या समस्या त्यांनी मानवतेने समजून घेतल्या होत्या. या समाजसेवेच्या व्रतातून आलेल्या खोलवरच्या प्रखर अनुभवातूनच त्यांची कथा अवतरली आहे. जे दिसले, पाहिले तेच वास्तव त्यांनी कथांतून मांडले आहे. खालच्या स्तरातील व्यथा-वेदनांनी जगणारा माणूस, त्यांचे बदललेले मन त्यांनी ग्रामीण साहित्यात उभे केले आहे. यापूर्वीची बहिरंगावर आत्मतुष्ट असलेली ग्रामीण कथा अंतरंग दर्शनाने कसदार बनली. ग्रामीण जीवनातील रांगडेपणा, साधेपणा, हजरजबाबीपणा, जिद्द या सर्व गोष्टी त्यांनी प्रथम ग्रामीण कथेत आणल्या. यांच्या लिखाणातून कळत-नकळत स्फूर्ती घेऊनच इतर ग्रामीण लेखक या क्षेत्रात उतरले. म्हणूनच आनंद यादव म्हणतात, "माटयांच्या कथेचा "कस" मोठा, जीवनाची अर्थपूर्णता पाहण्याची कुवत प्रतिभावंताची, म्हणूनच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते."[5]

**ग. ल. ठोकळ :-** 1940-45 या काळात ग्रामीण साहित्याला दोन दिशा लाभल्या. एक वास्तववादी आणि दुसरी मनोरंजनवादी. "मनोरंजनासाठी नवा बदल" हीच ठोकळांची प्रेरणा असलेली दिसून येते. इंग्रजीतील ग्रामीण वाड्.मयात दिसून येणारे ग्रामीण जीवन आणि तेथील व्यक्तिच्या

भावभावना मराठी ग्रामीण कथेत ठोकळांनी आणलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांच्या ब-याच कथांतून ग्रामजीवनदर्शन बाजूला पडलेले दिसते. ठोकळांची ग्रामीण कथा वास्तवाच्या पातळीवर असलेली दिसत नाही याचे पहिले कारण असे की, त्या काळच्या कथावाङ्‌मयात रुढ असलेल्या संकेताचे ओझे त्यांना दूर करता आले नाही. त्यामुळे वातावरणाची पार्श्वभूमी बदलून तोच कथा विषय त्यांच्या कथांतून पुन्हा चित्रित झाला. दुसरे कारण असे की, ठोकळ हे वृत्तीने कवी असल्यामुळे कथेतसुध्दा काव्यात्मवृत्ती आली. उदा. "नीट नाकासमोर जा" या कथेत गणू मास्तर आणि शेवंता यांची अशाच काव्यात्मकतेने ते रंगवितात. त्यांनी आपल्या कथेत काही गाणी घातलेली आहेत. हा प्रयत्न अभिनव असला तरी त्यामुळे कथेत कृत्रिमता वाढलेली दिसते. वास्तवापेक्षा अद्‌भुतता, व्यक्तिपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य काव्यमयता, नाटयपूर्णता यांचे त्यांना आकर्षण होते. ठोकळांनी आपली कथा ग्रामीणजीवन दर्शनापेक्षा मनोरंजनाला महत्व देऊन लिहिली.

**र. वा. दिघे :-** ठोकळांच्या समकालीन लेखक म्हणजे र.वा. दिघे. सहयाद्रीच्या कुशीतल्या व समुद्रकिना-यावरील कोकणचे चित्रण त्यांनी घडविले. त्यांचा "वादळ" हा कथासंग्रह प्रसिध्द झाला होता. दिघ्यांचा काळ काव्यमयता, अद्‌भूतरम्यता, चमत्कृती याकडे असल्यामुळे त्यांच्या कथेत वास्तवाचे अधिष्ठान कमी दिसते. परंतु रंजक कथानक, काव्यात्मवृत्ती आणि सकस भाषा या गुणांमुळे दिघ्यांची ग्रामीण कथा लक्ष वेधून घेते. त्यांच्या काव्यमय भाषेचा प्रत्यय त्यांच्या "पहिले बक्षीस" या कथेतून येतो. दिघे यांनी आपल्या कथांतून लोकगीते, ओव्या व इतर कवितांचाही उपयोग केला. जीवनाच्या गांभीर्यापेक्षाही हलकेफुलकेपणांकडे त्यांचा कल अधिक होता. सामाजिक वास्तवाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांची कथा अद्‌भुतात रमताना दिसते. रंजनप्रधानतेचे अवगुंठन असलेली दिघ्यांची कथा ग्रामीण जीवनाच्या सूक्ष्म पापुद्रयांना हात घालू शकली नाही.

**म. भा. भोसले :-** खेडयात राहून केवळ हौसेने व अंत:प्रेरणेने लेखन करणा-या म.भा. भोसले यांच्या कथेत निर्मळ आदर्शाच्या संदर्भाने मोजक्या पात्राद्वारे ग्रामीण जीवनाचे सुटसुटीत रेखाटन केले आहे. त्यांनी आपल्या कथांत ग्रामीण जीवन मनापासून रंगविले. पण ते सरळ, सुबोध वाटते. जीवनाची अर्थपूर्ण सखोलता कधीच भिडलेली दिसत नाही. त्यांच्या कथांत ग्रामीण दर्शन घडते पण अंतरंगाचे आंतरकप्पे उलगडता आले नाही हे जाणवते. ग्रामीण जीवनातील लहान-सहान समस्यांची मांडणी व सुशिक्षितांची जाणीव ही भोसल्यांच्या कथेची वैशिष्टये होत. त्यांचे लेखन पारंपारिक पध्दतीचे सरधोपट, एकपदरी व्यक्तिचित्रणे असणारे आहे. याचे दर्शन "अहेवं लेणं" "नांदाय जाते" या कथांतून जाणवते. मानवी मनाचे विविध धागे सुटे करुन सांगण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीमध्ये नसल्यामुळे दीर्घकाळ लेखन करुनही मराठी ग्रामीण कथावाङ्‌मयात ते आपला ठसा उमटवू

शकले नाहीत.

**व्यंकटेश माडगूळकर :-** 1945 च्या सुमारास मराठी कथेमध्ये महत्वपूर्ण परिवर्तन घडले व नवकथा उदयास आली. ग्रामीण कथेतही मूल्यात्मक फरक झाला. 1945 च्या सुमारास मौज-सत्यकथेतून माडगूळकरांनी अभावितपणे मराठी ग्रामीण कथेत मन्वंतर घडविले. ग्रामीण कथेला आशयाच्या, अभिव्यक्तीच्या अंगाने समृध्द करण्याचे काम व्यंकटेश माडगूळकरांनी पहिल्यांदाच केले. ग्रामीण जीवनाचा भरपूर अनुभव आणि दैवदत्त कलात्मक जाणीव यामुळे त्यांच्या कथा या ख-या माणसांच्या जिवंत कथा ठरल्या.

"माणदेशी माणसे", "गावाकडच्या गोष्टी", "हस्ताचा पाऊस", "उंबरठा" या त्यांच्या संग्रहातून त्यांनी रखरखाता दुष्काळी माणदेश उभा केला. पूर्वीच्या कथेतली कृत्रिमता आणि अद्भूतता यांना वर्ज्य करण्याचे काम माडगूळकरांच्या कथेने केले आणि ग्रामीण कथेला नवकथेच्या शेजारी आणून बसविले. कथा रचनेचे जुने संकेत आणि तंत्र फेकून दिले. निवेदनाच्या विविध शैलीचा प्रत्यय आणून दिला. पूर्वीच्या लेखकांच्या कथांपेक्षा गुणाच्या व रुपाच्याही दृष्टीने वेगळी कथा व्यंकटेश माडगूळकरांनी लिहिली व ग्रामीणकथा सत्वपूर्ण बनविली. त्यांची संवेदनशीलता ही अस्सल ग्रामीण संवेदनशीलता आहे. म्हणून ग्रामीण जीवनाचे मर्म ते नेमके हेरतात. त्यांनी माटयांच्याप्रमाणे ग्रामीण जीवन दुरुन पाहिले नाही, वा इतर काही लेखकांप्रमाणे रंजनासाठी ग्रामीण जीवनाचा उपयोग केला नाही. त्यांनी ग्रामीणजीवन अनुभवलेले आहे. ग्रामीण जीवनाचे जे सत्व, जी सामाजिकता त्याचेही त्यांना नैसर्गिकपणे आकलन झालेले आहे. आपल्या अनुभवांना कलारुप कसे द्यायचे याची त्यांना उपजतच जाण आहे असे दिसते. या कारणांनी माडगूळकरांनी आपल्या भोवतालची परिस्थिती अगदी वेच्क घटनांनी आणि नेमक्या शब्दांनी साकार केली आहे. त्याचबरोबर त्यांची व्यक्तिचित्रे विविध छटांनी नटली आहेत. सहजसुंदर भाषा, छोटी छोटी वाक्ये यामुळे त्यांची कथा कलात्मक उंची गाठते. माडगूळकरांची प्रेरणा शुध्द कलाकाराची होती. कोणत्याही वादाचा प्रसार त्यांना आपल्या साहित्यातून करायचा नव्हता. त्यामुळे त्यांची ग्रामीण कथा अल्पावधीतच मराठी वाचकात लोकप्रिय झाली. म.द. हातकणंगलेकरांनी म्हटल्याप्रमाणे, "माडगूळकरांनी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले."[6]

**शंकर पाटील :-** शंकर पाटलांनी माडगूळकरांच्या आगेमागेच कथालेखनाला सुरुवात केली. त्यांचे "आभाळ", "ऊन", "वळीव" यासारखे कथासंग्रह पाहिले की त्यांच्या कथेची वेगळी साक्ष पटते. मानवी मन आणि निसर्ग यांचा सुंदररितीने मिलाफ झालेला त्यांच्या कथेत दिसतो. मानवी मनातील

विविध सूक्ष्मतरल आंदोलने, मानवीजीवनावर निसर्गाचा झालेला परिणाम यांचे परस्परसंयोगी नाते, विविध विलक्षण तणाव त्यांच्या कथेला लाभले आहेत. खेडयातील जीवनापेक्षाही खेडयातील माणसांच्या मनाचा विचार त्यांनी अधिक केला हेही मराठी ग्रामीण कथेला नवीनच होते. त्यांना माणसाच्या मनाचा शोध घेणारी कथा खरी वाटत होती, म्हणूनच त्यांच्या कथांतून निसर्ग, ग्रामीण परिसरातील घटना व प्रसंग, मानवी मनाची स्पंदने हे सर्व घटक रासायनिक प्रक्रियेने एकरुप झाल्यासारखे वाटतात. ग्रामीण जीवनातले सनातन दु:ख देखील काही लक्षणीय कथांतून आळविले. ग्रामीण स्त्रियांच्या दु:खाची त्यांची जाण अधिक सविस्तर. या दु:खाची त्यांची भाषाही अधिक प्रभावी, परिणामकारक आहे. "आभाळ", "वेणा", "भार" यांसारख्या त्यांच्या कथांतून जाणवते. मानवी मनाची सहज जाण असल्यामुळे त्यांच्या कथेला फार मोठा दर्जा प्राप्त होतो.

सुरुवातीला व्यंकटेश माडगूळकरांच्याच पावलावर पाऊल टाकून शंकर पाटलांनी कथालेखनाला प्रारंभ केला. असे असले तरी या अनुकरणातून त्यांची कथा लवकर मुक्त झाली. आणि माणसांच्या अंतरंगाच्या दर्शनावर भर देऊ लागली. मनोविश्लेषण करणा-या कथा "वळीव", "भेटीगाठी", "ऊन" या कथासंग्रहामध्ये वाचावयास मिळतात. शंकर पाटलांची कथा ही केवळ गंमतीच्या गोष्टी सांगण्यासाठी अवतरत नाही. त्यात मानवी मनावर प्रकाश टाकलेला असतो. पाटलांच्या काही कथा उत्कृष्ठ आहेत. तरीदेखील चंद्रकांत बांदिवडेकरांनी खंत व्यक्त केली आहे की, "ग्रामीण जीवनातील बाहय स्थित्यंतराचा व त्यामुळे ढवळून जाणा-या ग्रामीण मनाचा वेध पुरेशा व्यापकपणे पाटील घेऊ शकले नाहीत असे वाटते. आणि त्याचे कारण त्यांनी स्वत:च सांगितल्याप्रमाणे ते बालपणी जे विश्व रसरसून जगले तेवढेच ते व्यक्त करतात असे वाटते. आणि माणसामाणसातल्या विविध संबंधाचे खरे तळकोपरे त्यांच्या लक्षात येत नाहीत. म्हणून पाटलांच्या कथात मानवी संबंधातील क्रौर्य, हिंस्त्रता, शोषण फारसे आले नाही."[7] ग्रामीण कुटुंबातील विविध नात्यांचे संबंध पाटलांनी आपल्या कथांतून उलगडून दाखविले आहेत. परंतु "व्यावसायिकतेचे सारे गुणावगुण त्यात शिरले. माडगूळकरांच्या अभिजात स्वरुपापासून ही कथा दूर गेली. ती अधिक संस्कारित, भाषावेल्हाळ, नाटयमय, संवादचतुर झाली पण तिचे सत्व कमी झाले. पाटलांच्या काही समर्थ कथांनी काही वेगळे गुण दाखविले आहेत. त्याच गुणांचा परिपोष आनंद यादव, सखा कलाल यांच्या कथात नंतर झालेला आपणांस आढळतो. या गुणांची जात आत्मलक्षी आविष्काराशी संबंधित आहे."[8]

**द. मा. मिरासदार :-** माडगूळकरांनी "गावाकडची माणसे" आणली तर मिरासदारांनी "गावाकडच्या हकिगती" कधी अतिशयोक्ति करुन तर कधी भडकपणा व गडदपणा आणून मोठया खुमासदार

पध्दतीने सांगितल्या. ग्रामीणजीवनात अदृश्यपणे वावरणा-या विनोदाचा धागा मोठया कौशल्याने मिरासदारांनी रंगविला. जीवनातील विसंगतीवर प्रामुख्याने बोट ठेवले. ग्रामीण घटनांचा, प्रसंगाचा व माणसांचा विनोदाच्या अंगाने उपयोग करुन विलक्षण लोकप्रियता मिळविली. विनोदी किस्से वापरुन मराठी ग्रामीण कथेला वेगळी दिशा दाखविण्याचा मान द.मा. मिरासदारांकडे जातो. शुध्द ग्रामीण विनोदी कथा द.मा.नीच प्रथम लिहिली. जीवनातील, स्वभावातील विसंगती ही विनोदाला कारण ठरते. "व्यंकूची शिकवणी", "माझ्या बापाची पेंड" इ. त्यांच्या कथासंग्रहातून मिरासदारांनी विनोदी, रंजनवादी ग्रामीण कथा लिहिली. परंतु केवळ विनोदाच्या प्रेरणेच लेखन केल्याने त्यांच्या कथालेखनाला काही मर्यादा पडल्या.

माडगूळकर, पाटील, द.मा. मिरासदार या तिघांच्या कथांविषयी अभिप्राय व्यक्त करताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "माडगूळकर, पाटील, मिरासदार या तिघांच्या कलात्मकतेबद्दल अभिमान वाटण्यासारखे पुष्कळ असले तरी या कथांतून जीवन जगण्यासाठी हेतूपूर्वक संघर्ष करणा-या ग्रामीण जनतेचा व त्याच्या संघर्षाचा अनेक अंगानी धारदार अनुभव येत नाही. मानवी जीवनाबद्दल पुष्कळ सहानुभूती असलेल्या त्यांच्या कथा काहीशा सुखवस्तू मनाने लिहिलेल्या वाटतात. त्यांच्यातील वेदना अस्सल असली तरी त्यात गुंतलेपणापेक्षा तटस्थतेचा भाग अधिक आहे, असे वाटते. त्यात वेदनेचा व्यापकपणा जाणवत नाही. या पार्श्वभूमीवर आनंद यादव, सखा कलाल, रा.रं. बोराडे, चारुता सागर, महादेव मोरे यांची कथा 1960 नंतर लिहिली गेली."[9]

सखा कलालांच्या कथांचा अभ्यास करण्यापूर्वी सखा कलाल समकालीन कथाकारांपैकी महत्वाच्या ग्रामीण कथाकारांनी मराठी ग्रामीण कथेत कोणती भर घातली याविषयीचा थोडक्यात आढावा घेऊ.

**आनंद यादव :-** 1963 पासून आनंद यादव सातत्याने लेखन करीत आहेत. त्यांनी कथालेखनाला प्रारंभ केला तेव्हा त्यांची बरीचशी काव्यरचना झालेली होती. कविप्रकृतीचे ग्रामीण कथाकार असा त्यांचा पिंड बनला. "मातीखालची माती", "खळाळ", "डवरणी" या संग्रहातून यादवांनी ग्रामीण शेतमजूरांची दु:खे रंगविण्याचा प्रयत्न केला. खेडयात राबणाराविषयी तळमळ, दारिद्रयामुळे अन्नालाही महाग झालेल्या लोकांची भावनिक ओढाताण, त्यामुळे निर्माण झालेले ताण, शेतक-यांच्या जीवनात येणारी नैसर्गिक संकटे व मानवनिर्मित संकटे, यांत्रिकीकरणामुळे झालेला भावनिक कोंडमारा यामुळे यादवांची कथा सकस बनत गेली. त्यांनी तिला काव्यात्मकतेची जोड देण्याचा प्रयत्न केला. "खळाळ" मधील कथांनी विशेषत: हे दाखवून दिले. प्रणयातील नवथरपणा, त्यातले कोमजलेपण, प्राण्या-पक्ष्यांवरील आंतरिक माया आणि जगण्याची धडपड यांच्या दर्शनाने वाचकही सुखावून जावा अशा

कथा यादवांनी लिहिल्या. त्यांनी प्रयत्नपूर्वक बोलीभाषेचाही वापर केला. त्यामुळे कथेच्या जिवंतपणाला आणखी बळ मिळाले. म.द. हातकणंगलेकरांनी यादवांच्या भाषाशैलीबाबत म्हटले आहे की, "यादवांचा "खळाळ" हा कथासंग्रह प्रसिध्द झाला आणि त्यातील "मोट", "धुणं" यासारख्या कथांतील भाषेच्या सुरावटीने मन हर्षभरित झाले. त्यातल्या थंडगार, खळाळत्या लावण्याने मनात पालवी फुटली. त्यांच्या या कथात खेडयातील जीवनाचे व्याकुळ आकलन दिसते. या आकलनाला कथारुप देताना सुरावटीच्या रचनेसारखी कथेची रचना करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि चिंतनशील निवेदनाची एक वेगळी बंदिश निर्माण केली. दु:खाची मूळ आर्तता, ते भोगत असतानाच त्याच्या चिंतनात वृत्ती बडवून टाकल्यामुळे या आर्ततेला प्राप्त होणारे नादमय सौंदर्य याबरोबरच भाषेच्या, प्रतिमांच्या सुप्त लावण्यमयतेचा चाललेला शोध यामुळे यादव ग्रामीण कथेला आविष्काराचे एक अभिनव परिमाण देऊन या कथेचे एक नवे घराणे निर्माण करीत आहेत असे लोभस दृश्य काही काळ दिसले"[11] आनंद यादवांच्या कथेचा अभ्यास केल्यानंतर हातकणंगलेकरांचे हे मत यथार्थच आहे असे वाटते.

यादवांची कथा ही प्रामुख्याने शेतावर घडणारी कथा आहे. म्हणून शेती व्यवसायातील येणारे शब्दही लक्ष वेधतात. मोट, नाडा, वाकुरं, मोटक्या, पाट, हीर, खोप, माळवं, खुरपी, चिपाडं इ. शब्दांमधून रानाचे वातावरण सहजपणे साकारुन जाते. ग्रामीण बोली, वाक्प्रचार आणि म्हणी यांनी संपन्न असते. यादवांच्या कथेतून याचा प्रत्यय येतो. उदा. नांगूर फिरवणे, थुका लावणे, आगापिच्छा नसणे इ. वाक्प्रचार आढळतात. त्याचप्रमाणे "देवाची करणी नि नारळात पाणी", "अंगापरीस बोंगा दांडगा" इ. म्हणीही त्यांच्या कथेतून आढळतात. बोलीतील काही शब्द ती ज्या भागात बोलली जाते त्या भागातील मातीचा गंध घेऊन येतात. त्याचबरोबर ते शब्द विशिष्ट अर्थही घेऊन येतात. ग्रामीण माणूस सुध्दा कधीकधी बोलताना सहजपणे प्रतिमांचा, उपमांचा वापर करतो. यादवांच्या कथेतून याचे प्रत्यंतर येते. यादवांची वर्णने अत्यंत चित्रमयी असतात. अशा वर्णनातून प्रत्यक्षानुभूतीचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. ग्रामीण जीवनातील ताण-तणावाबरोबरच त्याला अनुकूल वातावरणही यादव कथेत निर्माण करतात. त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रेही खास ग्रामीणतेचा प्रत्यय देतात. त्यांच्या गंभीर कथा अत्यंत समर्थ जाणिवांच्या कथा आहेत. खेडयातील निसर्ग, झाडे-झुडपे, पिके, शेतातील हंगामानुसार, ऋतुमानानुसार करावी लागणारी कामे यांची त्यांना स्वानुभवातून माहिती आहे. ग्रामीण दरिद्री माणसांचे दु:ख, त्यांची भाषा, ग्रामीण जीवनातील प्रश्न यांची त्यांना जाण आहे. त्यामुळे त्यांचे ग्रामीण जीवनाचे आकलन आणि कलात्मक अभिव्यक्ति उच्च दर्जाची आहे. काहीशी बहिर्मुख असणारी ग्रामीण कथा अंतर्मुख करण्याचा प्रयत्न यादवांनी केला. त्यांच्या बहुतेक कथांमधून

माणसाच्या मनावरच्या ताणाचे चित्रण येते. उदा. "खळाळ" संग्रहातील "वरातीचा शालू" या कथेतील विधवा "अंजना" विलक्षण काळजीत असते. कारण नागाची पूजा करायची तर थोडेसे दूध आणि लाहयापुरते जोंधळेही तिच्या घरात नाहीत. तीन महिन्यांनी "कंट्रोलात" तांदूळ आला. तो स्वस्त दरात मिळू लागला, पण तो आणायला पैसा नाही. पोरांच्या अंगावर नीट कपडेही नाहीत. निदान त्यांच्यासाठी भात तरी करावा म्हणून ती दिवसभर धडपडते. लवकर परत येण्याची शक्यता नसल्याने कोणीच तिला उसने देत नाही. सरुच्या सांगण्यावरुन ती तिच्या मालकिणीकडे मामलेदाराच्या बायकोकडे लग्नातला वरातीचा शालू गहाण ठेवण्यासाठी जाते. पण ती गहाण नको म्हणते, विकत मागते. नाईलाजाने पन्नास रुपयास ती तो शालू विकते. कंट्रोलच्या दुकानापुढे तांदळासाठी लागलेल्या रांगेत उभ्या असलेल्या पोरांकडे येते. तर दुकानातला तांदुळच संपलेला असतो. विषण्ण मनाने घरी येते. नव-याच्या भूतकाळातल्या आठवणी तिला अस्वस्थ करुन सोडतात. "हया लुगडयात पद्मिनीगत दिसतीयास तू" हे नव-याचे उद्गार आठवतात. ती बेचैन होते. शालूचे आलेले पन्नास रुपये घेऊन ती पुन्हा मामलेदाराच्या बायकोकडे जाते. पैसे परत करुन म्हणते, "बाई, हे तुमचं तुम्हाला पन्नास रुपये घ्या नि माझं मला वरातीचं लुगडं द्या." ती बाई कारण विचारते. मुलबाळं उपाशी असताना हे नेऊन काय करणार? असे विचारते. पण अंजना म्हणते, "म्हयनाभरात खाऊन जातील ते नि तेवढयात लाखामोलाचं लुगडं जाईल. काय तरी करीन म्हणं. माती खाऊन जगायला येईल." घरी येऊन ती ते लुगडं नेसून नव-याच्या आठवणीत गुंग होते. त्यातून बाहेर येते तेव्हा वास्तवाच्या जाणिवेने ती पुन्हा खचू लागते. या कथेत अंजनाच्या मनावरचा दुहेरी ताण चित्रित केला आहे. एकीकडे मुलांसाठी तडफडणारे आईचे हृदय आहे, तर दुसरीकडे नव-याच्या आठवणींनी व्याकुळ होणारे पत्नीचे विरही मन आहे. आनंद यादवाच्या कथामधून ग्रामीण दुःखी माणसांच्या मनावरील ताण-तणावाचे दर्शन घडते. माणसाच्या मनाचे चित्रण करताना शंकर पाटलाप्रमाणेच आनंद यादवही मनोविश्लेषणाचा वापर करतात. जणू एक मन आपल्याच अंतर्मनाशी संवाद करीत असावे अशी त्यांच्या कथांची मांडणी असते. या मांडणीतूनच त्या त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व व जीवनानुभव प्रकट होतात.

ग्रामीण भागात आणि समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षणाचे लोण पोहचले, पण त्या प्रमाणात नोक-या, उद्योग-व्यवसाय निर्माण होऊ शकले नाहीत. त्यामुळे बेकारीची समस्या किती तीव्र झाली आहे हे "भोवळ" या कथेतून प्रत्यायला येतेच शिवाय ग्रामीण सुशिक्षित तरुण मनाची व्यथाही या ठिकाणी अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. वासुदेव मुलाटे म्हणतात, "मानवी मनाची गुंतागुंत, त्यांची आंदोलने व विविध पैलू यांचे चित्रण शंकर पाटलांच्या कथेतून आलेले आहे. शंकर पाटलांच्या

कथेतून ही बलस्थाने आत्मसात करुन ग्रामीण कथा आणखी पुढे नेण्याचा प्रयत्न यादवांनी केला. काहीशी बहिर्मुख असणारी ग्रामीण कथा अंतर्मुख करण्याचा प्रयत्न यादवांनी केला."[11] यादवांची भाषाही मनातले विविधभाव टिपण्यासाठी अतिशय लवचिक रुप धारण करते.

आनंद यादवांच्या कथेतून अवतरणारा परिसर हा कागल-कोल्हापूरच्या आसपासचा परिसर आहे. त्या परिसरातील नुसती भौगोलिकता गोचर होत नाही तर त्या परिसरातील लोकाचाराचेही दर्शन घडते. उदा. "फाटयाचं पाणी" या कथेतील जत्रेचे वर्णन. त्या पंचक्रोशीतील लोकांचे श्रध्दास्थान असणारा म्हसोबा,जत्रेच्या काळात म्हसोबापुढे फुटणारे नारळ जसे आहेत तसेच कापली जाणारी कोंबडी आहेत. तसेच कोल्हापूर-कागल परिसरात यल्लमाला अतिशय महत्व आहे. किंबहुना तिच्या अदृश्य व्यक्तिमत्वातून समाजातील ताण-तणाव आकार घेताना दिसतात. या परिसरातील हे दैवत जनमानसात किती रुजून राहिले आहे हे आनंद यादव यांच्या "मातीखालची माती" या संग्रहातील "सखाराम" या व्यक्तिचित्रणात्मक कथेतून लक्षात येते. शेतक-यांचे मुक्या जनावरावर विशेषतः बैलावर अतिशय प्रेम असते हे त्यांच्या "मोट" आणि "इंजेन" या कथांतून जाणवते. "मोट" कथेतील हि-या बैलावर बाबूचे असेच अपार प्रेम असते. हत्तीसारखा दिसणारा हि-या ताकदीने तसाच प्रचंड होता. आठ-नऊ वर्षे तो राबला आणि एके दिवशी हगवण लागून मेला. मालकाने मेलेल्या हि-या बैलाच्या कातडीची नवी मोट शिवून घेतली. उरलेल्या कातडयात वादी, चाबूक तयार करुन घेतले. पण बाबूला याचेही दुःख झाले. हि-या जिवंत होता, तेव्हाही शेत पिकवत होता आणि मेल्यावरही तो मोटेच्या रुपाने पिकवतो आहे असे त्याला वाटले. तो मनात म्हणतो, "हि-यानं जलमभर नि जल्म संपल्यावरही पिकाला पाणी पाजलं. मोट वडून पाजलं, मोट होऊन पाजलं. हि-याचा पाय समद्या रानावर पडत हुता, पर हिरीत कवा पडला नव्हता. आता हि-या हिरीत गेला, पाण्यातबी गेला, आणि वडयाकडंच्या रानातल्या मातीतबी गेला." हि-याविषयीच्या दुःखाने व्याकुळ होऊन बाबूच्या मनात आलेले हे विचार त्याचे हि-याशी किती अटूट मनोबंध होते याचे प्रत्यंतर येते. "इंजेन" या कथेतही मालकाने इंजिन आणल्यानंतर बैलांकडे केलेले दुर्लक्ष बघून सित्याही असाच व्यथित होतो. मालक जेव्हा बैल हेडयांना विकून टाकतो तेव्हा स्वतः न्याहारीची भाकर बैलांना खाऊ घालतो. बदलत्या ग्रामीण जीवनाचे आणि जाणिवांचे चित्रण यादवांच्या कथेतून प्रकट झाले आहे.

थोडक्यात, ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण आणि सम्यक दर्शन यादवांच्या कथेतून घडते. त्यांनी त्या जीवनातील सूक्ष्म बारकावे टिपलेले आहेत. ग्रामीण माणसाच्या मनाचा सखोल असा शोध घेऊन त्यांची गुंतागुंत व कल्लोळ टिपले आहेत. यादवांच्या कथेविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात,

"ग्रामीण जीवनातल्या ढासळत्या जीवनमूल्यांचा, जीवनकलहाच्या वाढत्या तीव्रतेचा, ग्रामीण जीवनातील व्यवहारांचा व व्यापारांचा त्याचा अनुभव सूक्ष्म असतो. पण कथेचे मनोविश्व साकार करताना हे सर्व वास्तव पार्श्वभूमीसारखे असते. एका परीने ग्रामीण संवेदना, भावना व त्याला अनुरुप प्रतिमांची व भाषेची योजना, त्यांचे विलक्षण प्रभावी रसायन यादवांच्या कथेत आढळते ग्रामीण जीवनाची कथा व त्यांचे शोकाकुल करणारे अनुभव गहनतेचे परिणाम घेऊन येतात. आनंद यादवांच्या कथेत माडगूळकरांचे सूक्ष्म, वस्तूनिष्ठ निरीक्षण आहे. शंकर पाटलांची गंभीर करुणार्द्र जीवनदृष्टी आहे. आणि कथेच्या केंद्रीय अनुभूतीशी प्रारंभापासून शेवटपर्यंत लयात्मक अवस्थेत राहण्याची कविप्रवृत्तीही आहे. ही कथा भावकवितेसारखी अटकर बांध्याची जातिवंत ग्रामीण कथा आहे."[12]

**रा. रं. बोराडे :-** मराठवाडयातील लिहिणा-या लेखकांमध्ये ग्रामीण कथेच्या क्षेत्रात रा.रं. बोराडे यांनी डोळयात भरावी अशी कामगिरी केली आहे. रा.रं. बोराडे यांची "वसुली" ही कथा 1957 साली प्रसिध्द झाली. परंतु "पेरणी" हा त्यांचा पहिला कथासंग्रह 1962 साली प्रकाशित झाला. त्यांचा हा पहिला कथासंग्रह त्यांनी मराठवाडयाच्या मातीस अर्पण केला आहे. मराठवाडयाच्या मातीत जन्म घेणा-या या लेखकाचे आपल्या मातीवर, त्या मातीतल्या माणसांवर जीवापाड प्रेम आहे. तेथल्या माणसांची मने आणि मते ते चांगली जाणतात. आपल्या "पेरणी", "ताळमेळ", "मळणी", "वानवळा" इ. कथासंग्रहातून मराठवाडयातील ग्रामीण जीवन त्यांनी रेखाटलेले आहे.

त्यांच्या सुरुवातीच्या काही कथांवर शंकर पाटील, द.मा. मिरासदार व क्वचित प्रसंगी व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांचा परिणाम जाणवला तरी उत्तरोत्तर त्यांच्या कथेने स्वतःचा असा एक कलापूर्ण घाट शोधलेला दिसतो. माडगूळकर, पाटील, मिरासदार यांचे अंधानुकरण केले नाही. नव्या जाणिवा व नव्या अनुभूती यांना वेगळा आविष्कार देऊन त्यांनी स्वतःच्या कथेचे वेगळेच विश्व साकार केले. मराठी ग्रामीण कथेच्या दृष्टीने आपल्या कथेचे वेगळेपण सांगत असताना एका मुलाखतीत बोराडे यांनी सांगितले आहे, "ग्रामीण समाजातील नातीगोती विशेषतः ग्रामीण समाजातील नात्यागोत्याचे संबंध व या संबंधातून निर्माण होणारे ताण-तणाव माझ्या कथांमधून आलेले आहेत. शिवाय ग्रामीण समाजातील स्त्रियांच्या जीवनातील विविध स्वरुपाची दुःखे स्वाभाविकपणे माझ्या कथांमधून आलेले आहेत. विशेषतः "बोळवण" हा संपूर्ण कथासंग्रह स्त्री दुःखाच्या संदर्भात अभ्यासणाजोगा आहे. माझ्या कथा लेखनाचा आणखी एक विशेष असा की खेडयातील बालमनाची मनोरचना आणि त्याला म्हणून जाणवणारे खेडयातील विश्व हे माझ्या कथेचे विषय बनले आहेत. उदा. "भेग", "मळणी", "खेळ" इ. कथांतून दिसून येईल."[13]

बोराडयांच्या कथांचा केंद्रबिंदू खेडयातील स्त्री आहे. स्त्री त्यांच्या चिंतनाचा वरचेवर विषय बनलेली आहे. स्त्रीची विविध रुपे त्यांच्या कथेत पाहावयास मिळतात. त्यांच्या ग्रामीण कथेतील ही स्त्री माता आहे, कारभारीण आहे, सासुरवाशीण आहे, भावजय आहे, बहिण आहे. याखेरीज आणखी कितीतरी नात्यांनी ती आपल्यापुढे साकार होते. बोराडयांना स्त्री समजावून घेण्याची दुर्दम्य इच्छा आहे म्हणूनच त्यांच्या कथांमधून डोकावणारी ही ग्रामीण स्त्री चित्रे फारच बोलकी उतरली आहेत. अबोल, कष्टाळू, कर्तव्यदक्ष, निष्ठावान, चारित्र्यवान व घरच्या सुखासाठी स्वतःला विसरलेली अशी ही स्त्री मनाने आणि कृतीने निर्भय आहे. कामभावना ही माणसांच्या जीवनातील मूलभूत जाणीव. माणूस मग ती स्त्री असो की पुरुष असो, कामभावना त्याला अस्वस्थ करतात. ग्रामीण माणूस याला अपवाद नाही. वासनेचे हुंकार दडपताना होणा-या यातनांचे, त्यापायी घडणा-या प्रमादांचे दर्शन अत्यंत संयत भाषेत बोराडे यांच्या कथेतून घडते. उदा. "भेग", "कोरडी" इ. कथा. अशा कथांमधून वासनेची संयत चित्रे रेखाटली आहेत. अंबादास माडगूळकर आणि सूर्यकांत खांडेकर म्हणतात, "संसारातल्या लहान सहान विषयांवर कथा खुलविण्याची बोराडे यांची लकब शंकर पाटलांच्या कथेशी जवळीक सांगते."[14] बोराडयांच्या कथेने ग्रामीण जीवनातील वरवरच्या आणि ढोबळ दुःखापेक्षा, सूक्ष्म दुःखाचा शोध घेतला. बोराडयांच्या एकूण कथांचा विचार केला तर ग्रामीण माणसांच्या भाव-भावना, त्यांचे राग-लोभ, मान-अपमान आणि सुख-दुःख यांची उत्तम जाण त्यांना आहे. त्यामुळेच ग्रामीण माणसांच्या मनाचे ते अत्यंत प्रत्ययकारी व प्रभावी दर्शन त्यांच्या कथेतून घडवतात. ही माणसे विविध वयोगटातील, परिस्थितीतील आहेत. ते स्त्रियांची सोशिक मने जेवढया सामर्थ्याने उलगडून दाखवतात तेवढीच पुरुषाची मने उलगडून दाखवतात.

खेडयातील शेतक-यांच्या जीवनातील अनुभव त्यांच्या कथेतून व्यक्त झालेले दिसतात. स्वतः बोराडे खेडयातूनच आणि शेतकरी कुटुंबातूनच आलेले आहेत. हे जीवन त्यांनी स्वतः प्रत्यक्ष अनुभवले आहे, भोगले आहे. त्यामुळे शेतीविषयक समस्या आणि जाणिवांचे चित्रण त्यांच्या कथांतून प्रकट झाले आहे. खेडयातील माणसे, त्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दती, परिस्थितीने त्यांच्या नशिबी आलेले दारिद्रय, दारिद्रयापोटी उपसावे लागणारे अपार कष्ट, या कष्टमय जीवनातही जगण्याची उमेद बाळगून असलेले मन, हया मनाचे ताण-तणाव, गुंतागुंत याचे चित्रण बोराडे आपल्या कथेतून करतात. एकूणच नात्यागोत्यातील संबंधाविषयी त्यांना आकर्षण आहे. खेडयातील विवाहपध्दती, रीतीरिवाज, परस्परांतील मान-सन्मान यामधून अनेक ताण-तणाव निर्माण होतात, याचे चित्रण "नातीगोती" या कथासंग्रहातून झालेले आहे. या कथासंग्रहातील कथा या अशा ताण-तणावावरच आधारित आहेत. बाप, मुलगी, जावई, व्याही यासारख्या नात्यातील हे ताण आहेत.

बोराडयांच्या कथेतून निसर्गाची विविध रुपे दृष्टीस पडतात. मराठवाडयात तसा पाऊस कमीच पडतो. तरीही एखादेवर्षी त्याचे प्रमाण आणखी कमी होते आणि दुष्काळाचे आगमन होते. "चुंबळ" ही त्यांची कथा दुष्काळाच्या भयंकर परिस्थितीवरच आधारलेली आहे. मराठवाडयाचा भौगोलिक परिसर, त्याचे वैशिष्टय आणि त्याचा जनमाणसावर होणारा परिणाम, त्यातून निर्माण होणा-या समस्या यांचे चित्रण त्यांच्या कथांतून येते. ब-याचशा कथांची सुरवात निसर्गवर्णनाने होते. उदा. "लागेबांधे", "लगीन", "बांध", इ. कथांची सुरवात निसर्गवर्णनाने होते. बोराडयांच्या कथेमध्ये निसर्गाला महत्वाचे स्थान आहे. निसर्गाच्या सान्निध्यात त्यांची कथा फुलते. कळत-नकळत निसर्ग त्यांच्या कथेत वावरतो. त्यांच्या कथेतील निसर्गाला वेगळे काढून कथेचा विचार करताच येत नाही.

ग्रामीण जीवनातील अनेक विषयांना बोराडयांच्या कथेने स्पर्श केलेला आहे. ग्रामीण जीवनातील रंजकतेचा खोटा सोस त्यांच्या कथेला नाही. या जीवनातल्या नात्यागोत्याचे भावबंध ती चांगली आळखते व जोपासते त्यामुळे त्यांच्या कथाविश्वाचा असा एक परीघ ठरुन गेलेला आहे.

**महादेव मोरे :-** 1959 पासून लेखन करणा-या महादेव मोरे यांचे कथाविश्व पूर्वसूरींच्या ग्रामीण कथालेखकापेक्षा वेगळे आहे. निपाणीच्या आसपासचे तंबाखूच्या धंदयांतले कामगार, टॅक्सी, ट्रक धंदयातले ड्रायव्हर, क्लीनर, मालक, एजंट, वेश्या, जोगतिणी, डोंबारी अशा कितीतरी उपेक्षितांच्या आयुष्याची कर्मकहाणी मराठी कथेत महादेव मोरे यांनी प्रथमच आणली. मोरे यांच्या कथेतून आविष्कृत होणारा परिसर हा निपाणी आणि महाराष्ट्र-कर्नाटक सीमेलगतचा भाग आहे. तंबाखू आणि नागवेलीच्या पानाचे मळे हा परिसर त्यांच्या अनेक कथांतून साकार होतो. महादेव मोरे यांच्या कथेतून अवतरणा-या माणसांविषयी त्यांनी स्वतःच म्हटले आहे की, "खेडयांच्या यांत्रिकीकरणामुळे ड्रायव्हर, क्लीनर, मेस्त्री लोकांची नवीनच जात निर्माण झाली. हया लोकांच्या प्रसंगी श्वापदांसारख्या वासना शमवायला वेश्यावर्गही आला. हया वेश्यावर्गापाठोपाठ त्यांना सांभाळणा-या "घरवाल्या" त्यांचे दलाल, तसेच कायदयातून पळवाट काढण्यासाठी त्यांनी ठेवलेले "नामिनल" यजमान, त्यांचा फुकट उपभोग घेऊन त्यांच्याकडून हप्ते वसूल करणारे पोलिस, वरचे अधिकारी आले असता त्यांच्यापुढे टाकण्यासाठी कडबा वैरणीसारखा त्यांचा केला जाणारा उपयोग हे सारे माझ्या कथेत-कादंब-यात आले".[15] अर्थातच मो-यांच्या कथेतून कृषक जीवनाचे चित्रण येत नाही. तसेच कृषक जीवनाशी निगडीत असलेले, गावगाडयाच्या बंधनात अडकलेले जीवनही येत नाही. ही माणसे मुळची ग्रामीण आहेत, परंतु जगण्यासाठी निपाणीसारख्या तालुक्याच्या गावी आलेली आहेत हे लक्षात घेऊनच मो-यांच्या कथेकडे बघावे लागते.

ग्रामीण भागातील सुशिक्षीत बेकार तरुण आणि पोटासाठी भरकटत जाणा-या स्त्रियांचे चित्रण ते करतात. उदा. "गिधाड" या कथेत दुष्काळाच्या भीषण खाईत सापडलेल्या दरिद्री मजुरांच्या कटुंबाचे चित्रण आहे. या कथेतील "ती" तरुण आहे. आठ दिवसांपासून मुकादमाने मजुरीचे पैसे दिले नाहीत. त्यामुळे अगतिक झालेली "ती" आई-बाप-भावंडे यांच्यासाठी नाइलाजाने एका तरुणाला दहा रुपयाच्या मोबदल्यात देह अर्पण करते. भेदक जीवनदर्शनासाठी त्यांची कथा प्रसिध्द आहे. त्यांच्या कथेतून चित्रित होणा-या व्यक्ती समाजाच्या सर्व स्तरातून आलेल्या आहेत. तपशीलाने लिखाण आल्यामुळे एकप्रकारचा बटबटीतपणा त्यांच्या कथेत आढळतो, पण विषयाचे नाविन्य म्हणून त्यांची कथा स्मरणात राहते. त्यांच्या कथा शहर आणि गाव यांच्या सीमा रेषेवरच्या कथा आहेत. त्या ख-या अर्थाने शोषितांच्या कथा आहेत. शोषणाची विविध रुपे ती साकार करतात. त्यांची माणसे दु:ख सोशिकतेने भोगत असतात. दरिद्री आणि अशिक्षित स्त्री जीवनाच्या लैंगिक शोषणाच्या प्रभावी कथा त्यांनी लिहिलेल्या आहेत त्यांत सवंगपणा नसतो, तर एक विदारक दृष्टी असते. ड्रायव्हर पेंटर, खानावळवाले, मजूर, रक्तदान करुन जीवन जगण्याचे ओझे वाहणारे बेकार तरुण, गर्मीने सडलेल्या वेश्या, जीवनाचा डाव हरलेल्या वृध्दा यांचे जग ते सामर्थ्याने उभे करतात . हे जग त्यांच्या अनुभवाचे आहे. या जगातील गोतावळा त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला आहे. देवास सोडलेल्या देवदासी आणि नंतर बनलेले त्यांचे वेश्याजीवन त्यांनी आपल्या कथेत अतिशय परिणामकारकपणे दाखविले आहे.

"काळोखातील खुणा" या त्यांच्या कथेत "यलव्वा" या स्त्रीच्या दु:खाचे एक वेगळे दर्शन आपल्याला घडते. मराठीतील रुढ चाकोरीहून नवे वेगळे आणि आगळे विषय त्यांनी हाताळलेले आहेत. त्यांच्या कथेतील पात्रांना जात नाही पण ती विलक्षण व शोषित मंडळी आहे. त्यांची "भाषासमस्या" यांचे चांगले आकलन मोरे यांना आहे. मोरे यांच्या कथेसंबंधी आनंद यादव म्हणतात, "महादेव मोरे यांची कथा ग्रामीण जीवनातील विविध स्तर, विशेषतः खालचे स्तर हाताळण्याचा प्रयत्न करते, त्यांची बुध्दी त्यांच्या पिढीतील इतर लेखकांच्या तुलनेने अधिक तरल आणि वृ-ती उपक्रमशील आहे. कथेचे विविध घाट शोधण्याचा ते त्यांच्या परिने सतत प्रयत्न करतात. पण त्यांच्या बहुसंख्य कथा वाचल्यानंतर असे जाणवते की, त्यांच्या प्रयत्नात विचारपूर्वकता कमी आहे. मराठीतील नागर व ग्रामीण लेखकांच्या विविध कथा वाचून त्यांच्या घाटांना अनुसरुन आपली कथा त्यांच्यासारखी करावी अशा केवळ तात्कालिक प्रेरणेने ते आपल्या अनेक कथा लिहित असावेत. या प्रेरणेने "स्वतंत्र जाणीव" प्रत्ययाला येत नाही. त्यामुळे त्यांच्या कथारुपांचा परिणाम

मनावर विस्कळीत होतो. भाषाशैलीत ते स्वतंत्रपणे रमताना दिसतात. एकूण कथेच्या संदर्भात एखाद्या घटनेला वा संवादाला काय स्थान आहे, याचे भान त्यांना पुष्कळवेळा नसते. कित्येकवेळा प्रेमभावना आणि लैंगिक भावना यांच्या आहारी जाऊन आपली कथा वास्तवापासून वंचित करुन भडक, रोमॅंटिक करण्याचा प्रयत्न करतात. या मोहातून महादेव मोरे जर सुटले तर उ-तम प्रकारचे भाषासाधन लाभलेला, प्रयोगशीलतेवर प्रेम करणारा एक बुध्दिमान लेखक मराठी ग्रामीण साहित्याला मिळेल असे वाटते". [16]

दलित पददलितांच्या शोषणाचे चित्रण हा मोरेच्या साहित्यकृतीचा मूळ गाभा आहे. संवेदनशील वृतीने तळागाळातल्या माणसांच्या भावविश्व शोधण्याच्या त्यांच्या प्रतिभेने केलेला प्रयत्न अपूर्व आहे. पांढरपेशा, नागरी संवेदनाशीलतेला अजूनही ज्या वास्तवतेचे भान नव्हते ते त्यांनी करुन दिले असेच म्हणावे लागेल. एकंदरीत, महादेव मोरे हे समाजातील उपेक्षित, कष्टकरी, श्रमिक स्त्री पुरुषांच्या जीवनाची दु:खे आपल्या कथांतून मांडतात. ग्रामीण भाषेचा वापर व लेखनातील उपक्रमशीलता , सातत्य वाखाणण्यासारखे आहे.

**चंद्रकुमार नलगे :-** नलगे यांनी साधारणत: 1961 -62 च्या दरम्यान कथालेखनाला प्रारंभ केला. यांच्या कथेतून आविष्कृत होणारा परिसर हा सामान्यत: वारणेच्या खो-याचा परिसा आहे. व्यवसायानिमि-त जरी नलगे यांचे वास्तव्य शहरात असले तरी जीवनाचा बहुतांश काळ खेडयातच गेलेला असल्यामुळे खेडयातील सर्वसामान्य माणसांच्या सुखदु:खाचा त्यांना अनुभव आहे.

. चंद्रकुमार नलग्यांनी ब-याच कथांमधून आख्यायिकांचा वापर केलेला दिसतो. "अंगाई" ही कथा त्यापैकीच. गावाच्या भल्यासाठी काळजी वाहणारा चिमाजी पाटील आणि त्यासाठीच आपले व आपल्या मुलांचे बलिदान करणारी हौसा या कथेत आहेत. गावाच्या तळयात पाणी यावे म्हणून चिमाजी पाटलाची सून हौसा तिच्या तान्हया बाळासह बळी गेलेली असते. मागे वळून पाहिल्याने शीळ होऊन पडलेला नवरा आणि दर पौर्णिमेच्या चांदण्या रात्री हौसाचे गीत तळयाकडून ऐकू येणे हे सारेच अद्‌भूत आहे. या संदर्भात वासुदेव मुलाटे म्हणतात, "योगायोगाचा वापर आणि कृत्रिमपणे केलेला कथेचा शेवट यामुळे त्यांची कथा वास्तवापासून दूर जाते म्हणूनच या कथेचे नाते र.वा. दिघे किंवा ठोकळ यांच्या कथेशी जुळते." [17]

नलग्यांची ग्रामीण कथा प्रामुख्याने कौटुंबिक आणि भावनाप्रधान वाटते. मांगल्य, नीती या जीवनमूल्यांबद्दलची सश्रध्दभावना नलग्यांच्या कथांतून व्यक्त होते. ग्रामीण अनुभव जरुर त्या तीव्रतेनुसार ते ग्रामीण बोलीभाषेतून उत्कटतेने रेखाटतात. नलग्यांच्या कथेत ग्रामजीवनाच्या

स्थित्यंतराचे चित्र दिसते. उदा. "राखणाची काठी" मधील रावजी म्हणतो,"पण आता पयल्यातलं काय -हायलं न्हाय सायब. वारं न्यारं आलं. माणसं बदलली. मनं झपाटली. वाचा इटली. गावात इलक्शन आलं नि शेतात हायब्रीड उगावलं. आणिक कोणकुणाचं न्हाय -हायलं. पांढरी कापडं आंगावर चढली बगळयाच्या पकासारखी पांढरी धोट. पण आत काळा माणूस-" ग्रामजीवनातून येणा-या स्थित्यंतराचे आणि बदलणा-या मानवी मनाचेही चित्रण केले आहे. सूक्ष्म मनोविश्लेषणात किंवा सखोल व्यक्तिरेखाटनात अवगाहन न करताही आपल्या हेतू उद्दिष्टांची टीप वाचकांच्या मनावर ठसविण्यात नलगे वाक्‌बगार आहेत. नलग्यांची कथा वाचून झाल्यानंतर मनाला शांत आणि सात्विक समाधान देते. "पंढरीची वाट" ही नलग्यांची प्रातिनिधिक कथा. त्यांच्या मर्यादांची व सामर्थ्यांचीही प्रचिती देणारी आहे.

परिस्थितीच्या कोंडीत सापडल्याने गैरमार्गाला गेलेली माणसे अंतर्यामी अत्यंत प्रामाणिक, माणुसकी जपणारी असतात हे त्यांच्या कथेतून सांगण्याचा प्रयत्न दिसून येतो. उदा. "पंढरीची वाट" या कथासंग्रहातील "वेताळ" ही कथा. या कथेतील पांडू त्यांच्या गरीब आई-बापाला सावकाराने लुबाडल्याने सूड घेण्यासाठी दरोडेखोर बनतो. गैरमार्गाने गरिबांना लुबाडणा-या श्रीमंतांना तो लुटतो आणि गरीब माणसांना मदत करतो. लुटीतील एक पैसाही तो त्याच्या कुटुंबासाठी वापरत नाही.

वासुदेव मुलाटे नलग्यांच्या ग्रामीण कथेविषयी म्हणतात, "नलग्यांच्या कथेत ग्रामीण माणसे, ग्रामीण परिसर, संवादातून येणारी त्या परिसरातील ग्रामीण बोली, वातावरण एवढे असूनही ती तितकीशी प्रत्ययकारी होत नाही असे जाणवते. त्याचे एक कारण ही कथा वास्तवापासून दूर जाते. तिला अद्भुतता, कल्पनारम्यता आणि रंजकतेचीही ओढ आहे."[18]

**चारुता सागर :-** 1970 च्या आसपास लेखन करणा-या ग्रामीण लेखकांपैकी चारुता सागर हे एक होत. त्यांचा "नागीण" हा कथासंग्रह त्यांच्या ग्रामीण कथालेखनाच्या दृष्टीने अभ्यासण्यासारखा आहे. चारुता सागराचे लेखन अल्प असले तरी ग्रामीणच नव्हे तर एकूण जीवनाचाच चारुता सागरांना संपन्न अनुभव आहे. भरपूर व बहुविध अनुभव घेतल्यानंतरच त्यांनी कथालेखनास प्रारंभ केला आणि लवकरच त्यांच्या कथांनी चोखंदळ वाचकांचे आणि समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या कथांतून आविष्कृत होणारा परिसर हा साधारणतः सांगली-मिरज याच्या आसपासचा आहे. त्यांना ग्रामसंस्कृतीचे, तेथील पारंपरिक रचनेचे उत्तम आकलन आहे. त्या आकलनास संपन्न अनुभवाचा आधार आहे. त्यांच्या "नागीण" व "दर्शन" यासारख्या कथा अविस्मरणीय आहेत.

त्यांची "नागीण" ही एक उत्कृष्ट कथा आहे. नागिणीसंबंधी ग्रामीण भागात प्रचलित

असणा-या रुढ समजुतीच्या आधारे प्रेम आणि सूड यांचे तरल पातळीवरील भावनिक द्वंद्व या कथेत साकार केले आहे. चंद्री ही कथेची नायिका बालपणापासून नाग सापाला फार भीत असते. मात्र तिच्या नव-याला-बापूला लहानपणापासून नागसाप मारण्याचे वेड असते. एकदा शेतात बोलत बसलेले असताना चंद्री-बापूला नागनागिणीचे प्रेमाने धुंद झालेले युगुल दिसते. साहजिकच चंद्रीच्या विरोधाला न जुमानता बापू या जोडीला मारण्यास धावतो. नागाला मारण्यात बापूला यश मिळते. पण नागीण निसटून जाते. सूडाने पेटलेली नागीण चंद्री व बापूवर डूक धरते. "तू माझा प्रियकर मारलास तर मी तुझी प्रिया मारते" या भावनेने जणू काही ती नागीण सतत चंद्रीच्या मार्गात आडवी येऊन तिला सतत भीती दाखवते. त्यामुळे चंद्री सतत मानसिक दडपणाखाली वावरत असते. अशीच एकदा शेतात भाजी खुडायला म्हणून चंद्री गेली असताना संधी साधून चंद्रीला नागीण डसते व आपल्या प्रियकराच्या हत्येचा बदला घेते. चंद्रीच्या विरहाने व्याकुळ झालेला आणि सूड व द्वेष भावनेतून जळणारा बापू नागिणीच्या शोधात हिंडू लागतो. शेतात ठिकठिकाणी त्याला चंद्रीच्या आठवणी येतात, भास होऊ लागतात. चंद्रीच्या दु:खाने वेडावून असाच एकदा शेतात बसला असताना चंद्री आल्यासारखे वाटते. पण प्रत्यक्षात तेथे नागीण येते. पत्नीच्या विरहाने व्याकुळ झालेला बापू आणि प्रियकराच्या मृत्यूने दु:खी झालेली नागीण परस्परांसमोर स्थिर नजरेने एकटक बघत राहतात. आपल्या प्रिय व्यक्तिच्या विरहाने समपातळीवर आल्यानंतर मनातील सूडभावना निवत जाते. बापूच्या काठीवरील हात ढिला पडतो तर नागीणही निश्चलपणे उभी राहते आणि कथा संपते.

. बापू आणि चंद्री यांचे भावविश्व उध्वस्त करणारी ही कथा आहे. जनावराच्या आणि माणसाच्या दु:खाचे अभिन्नपण या कथेतून प्रकट होते. संतप्त झालेली नागीण शेवटी वाचकांच्याही मनात उतरते. मानव आणि प्राणी यांच्यातील सुखदु:ख कसे समान असते याचेही दर्शन या कथेतून घडते. या कथेविषयीचा अभिप्राय व्यक्त करतांना म.द. हातकणंगलेकर म्हणतात, " नजरबंदी करणारे सर्पदर्शन, मृत्यूच्या कभिन्न छायेत गाढ होत चाललेले पति-पत्नीचे प्रेम ही या कथेची मनात झरत राहणारी वैशिष्टये कथेतले प्रसंग जमविल्यासारखे भासले तरी ते इतक्या ताकदीने उभे केले आहेत की रचनेतील कृत्रिमतेचा भाव कुठल्याकुठे लोप पावावा."[19]

चारुतासागर यांनी डोंबारी, कोल्हाटी, जोगतिणी यांच्यावर लिहिलेल्या कथा प्रत्ययकारी आहेत. "दर्शन" कथेतील पुतळाबाईची व्यक्तिरेखा ही पु-या ताकदीनिशी त्यांनी उभी केली आहे. "ढोलम" ही कथा डोंबा-याच्या जीवनावर आधारित आहे. या माणसांना पोटासाठी भोगाव्या लागणा-या यातना जशा येथे चित्रित होतात तसेच त्यांचे आपआपसातील हेवेदावे, सोयरेसंबंध आणि रीतिरिवाज

यांचेही दर्शन लेखक घडवितो. "दावं", "म्हस", "भूक" आणि "राखण" या कथा शेतकरी जीवनातील व्यथा, वेदना, आणि स्वप्नांना प्रकट करतात. त्यांच्या कथा ग्रामीण समाजाच्या अनुषंगाने आपल्या समोर येतात. त्यांच्या कथेतला निसर्ग हा अपरिहार्य अशा भावभावनांच्या रुपात प्रत्ययाला येतो. माणसाप्रमाणे तो बोलताना, बहरताना, गंधावताना आपल्यापुढे येतो. हा निसर्ग अबोल आहे पण जेव्हा माणूस भावनांच्या आवर्तात सापडतो तेव्हा तो बोलका होतो.

चारुता सागरांनी शब्दांचे आणि भाषेचे सामर्थ्य उत्तम त-हेने जाणले आहे. म्हणून योग्य शब्दात, योग्य वाक्यात ग्रामीण माणसाचे मन आणि परिस्थिती ते चित्रित करतात. भाषेच्या संदर्भात नवे प्रयोग जरी केलेले नसले तरी कथेतील जीवनविश्व प्रत्ययकारी पध्दतीने अभिव्यक्त होईल अशी भाषा कथेसाठी वापरली. परिणामकारकतेसाठी आवश्यक अशा शैलीचा अवलंब केला. ही भाषाशैली व त्यांच्या कथेतील आशयाभिव्यक्तीला पोषक अशीच आहे.

चारुता सागरांच्या कथांमधून ग्रामीण जीवन आणि त्या जीवनातल्या भावभावना चित्रित होत असल्या तरी त्यांच्या लेखनाच्या काही मर्यादा आहेत हे लक्षात येते. त्यामुळेच ग्रामीण वातावरण आणि त्या वातावरणातील वास्तव चित्रित करता करताच ते वास्तवापासून दूर गेलेले दिसतात. वास्तविक त्यांच्या कथांचे विषय ग्रामीण जीवनाशी निगडीत असे व वैविध्यपूर्ण असतात, परंतु कथेची मांडणी करत असताना ते स्वतःच हरवून जातात आणि मुख्य विषयाकडे व आशयाकडे त्यांचे दुर्लक्ष होत जाते. कथावस्तूत ठिसूळपणा येऊन कथेच्या शेवटासाठी भरकटत जातात. चारुता सागरांबद्दल लिहिताना डॉ. आनंद यादव यांनी त्याच्या मर्यादेवर नेमके बोट ठेवले आहे. ते म्हणतात, "सामाजिकतेची जाणीव ठेवूनही कथा भावनिर्भर करण्याची सागरांची वृत्ती स्तुत्य आहे. पण कलात्मकतेचे भान ठेवून कथा लिहित नसावेत असे वाटते. प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी कथेतील भाववृत्तीचे ते स्वतःच भारुन जात असावेत. त्यामुळे त्यांची कथा अनेकवेळा वाहवत जाते. तिला संयम राहत नाही. तिचे कलात्मकतेचे भान सुटते. तिच्यातील सामाजिकता आणि काव्यात्मकता त्यांनी डोळसपणे जोपासली तर त्यांच्या कथेला एक मोठी ताकद प्राप्त होईल असे वाटते."[20]

**सारांश :-**

1897 च्या दुष्काळाचे चित्रण करणारी "काळ तर मोठा कठीण आला" ही हरिभाऊंची गोष्ट ग्रामीण कथेच्या जन्माची खूण मानली जाते. शेतक-यांची दुर्दशा त्यांनी रंगविली. सुखठणकर सरदेसाई यांनी समाजचित्रणापेक्षाही समाज प्रबोधनासाठी कथा लिहिल्या. श्री. म. माटयांनी मात्र ख-या अर्थाने ही माणसांची कथा केली. "उपेक्षितांचे अंतरंग" दाखविले. त्यांच्यातील "माणुसकीचा

गहिवर" कसा अनावर आहे याची प्रचिती आणून दिली. म्हणूनच ग्रामीण कथेचे जनकत्व त्यांच्याकडे जाते. समाजातील उपेक्षित माणसाचे चित्रण करुन माटयांनी खरे समाजदर्शन घडविले. ठोकळ-दिघे यांनी मात्र ग्रामीण रांगडेपणाबरोबरच अतिरंजिकता, मनोरंजकता, काव्यमयता आणली. यावेळी ग्रामीण कथेचे वास्तवाशी असलेले नाते हळूहळू दुरावत गेले. घडवून आणलेल्या योगायोगांची गर्दी झाली. ग्रामीण कथा रोमँटिक झाली. म. भा. भोसले यांनाही ग्रामीण जीवनाचा अनुभव होता. त्यांनी ग्रामीण तपशीलही भरले पण त्यात जिवंतपणा येऊ शकला नाही.

व्यंकटेश माडगूळकरांनी मात्र सर्वार्थाने मराठी ग्रामीण कथेला उच्च पातळीवर नेले. आशयसंपन्न, कसदार कथा लिहून ग्रामीण समाजाचे सर्व अंगानी चित्रण केले. माणदेशी माणसाच्या शरीराबरोबर त्यांच्या मनाचाही वेध घेतला. पुढे शंकर पाटलांनी जो मनोविश्लेषणाचा रंग अधिक गडद केला त्याची मुळे माडगूळकरांच्या लेखनात आहेत. शंकर पाटलांच्या कुटुंबकथांनी माणसाच्या मनाच्या ताण-तणावाचे चित्रण केले. ग्रामीण स्त्री अधिक्याने आणि गांभीर्याने रंगविली. मिरासदारांनी ग्रामीण जीवनात अदृश्यपणे वावरणा-या विनोदाचा धागा मोठया कौशल्याने रंगविला. जीवनातील विसंगतीवर प्रामुख्याने बोट ठेवले. परंतु केवळ विनोदाच्या प्रेरणेने लेखन केल्याने त्यांच्या कथालेखनाला काही मर्यादा पडल्या. आनंद यादवांनी ग्रामीण कथा अधिक काव्यमय केली. तिला चिंतनशील केले. यादवांनी प्रयत्नपूर्वक बोलीभाषेचा वापर केला. बोलीतून पूर्ण कथा लिहून एक वेगळा प्रयोग केला. खेडयात राबणाराविषयी तळमळ, दारिद्रयामुळे अन्नालाही महाग झालेल्या लोकांची भावनिक ओढाताण, त्यामुळे निर्माण झालेले ताण, शेतक-यांच्या जीवनात येणारी नैसर्गिक संकटे, यांत्रिकीकरणामुळे झालेला भावनिक कोंडमारा यामुळे यादवांची कथा सकस बनत गेली. यादवांनी ग्रामीण जीवनातील सूक्ष्म बारकावे टिपले. काहीशी बहिर्मुख असणारी ग्रामीणकथा अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला.

मराठवाडयातील ग्रामीण कथाकार रा. रं. बोराडे यांनी ग्रामीण समाजातील नात्यागोत्याचे संबंध व या संबंधातून निर्माण होणारे ताण-तणाव चित्रित केले. विशेषतः ग्रामीण स्त्रीची विविध रुपे त्यांच्या कथांतून चित्रित झाली. नलगे यांच्या कथांतून आख्यायिकांचा वापर होऊ लागला. त्यांची ग्रामीण कथा प्रामुख्याने कौटुंबिक आणि भावनाप्रधान झाली. मांगल्य, नीती या जीवनमूल्यांबद्दलची सश्रध्द भावना व्यक्त होऊ लागली. संख्येने अल्प पण गुणांच्या दृष्टीने अधिक लक्षणीय कथा म्हणजे चारुता सागरांची. त्यांच्या कथेतून डोंबारी, कोल्हाटी, जोगतिणी यांचे चित्रण आले. महादेव मोरे यांचे कथाविश्व पूर्वसूरींच्या ग्रामीण कथालेखकांपेक्षा वेगळे ठरले. ग्रामीण भागातील सुशिक्षित

तरुण आणि पोटासाठी भरकटत जाणा-या स्त्रियांचे चित्रण त्यांच्या कथेत आले. ग्रामीण जीवनातील नवनवे भाग आपल्या कथेत आणून मराठी ग्रामीण कथा समृध्द केली. त्यामध्ये चारुता सागर व महादेव मोरे यांच्या नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मराठी ग्रामीण कथेचा विकास असा होत गेला.

xxxxx

**संदर्भ :-**

1. संपा. कुलकर्णी पंडित अनंत, यादव आनंद, मातीतलं मोती, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे प्रथमावृत्ती, 1970, पृ. 10.
2. तत्रैव, पृ. 4
3. संपा. नलगे चंद्रकुमार, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, कोल्हापूर, ऑक्टो-नोव्हें-डिसें., 1991, पृ. 27.
4. संपा. कुलकर्णी पंडित अनंत, यादव आनंद, उनि, पृ. 5
5. यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, 1979, पृ. 15.
6. हातकणंगलेकर म.द., मराठी कथा : रुप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1986, पृ. 42.
7. बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 1986, पृ. 149.
8. हातकणंगलेकर म.द., उनि, पृ. 44
9. बांदिवडेकर चंद्रकांत, उनि, पृ. 150
10. हातकणंगलेकर म.द., उनि, पृ. 46
11. मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास, साहित्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1992, पृ. 72.
12. बांदिवडेकर चंद्रकांत, उनि, पृ. 150
13. कोतापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, 1985, पृ. 124.

14. संपा. माडगूळकर अंबादास, खाडिकर सूर्यकांत, मराठी ग्रामीण कथा, लेखन वाचन भांडार, पुणे, दुसरी आवृत्ती, 1979, पृ. 28
15. हातकणंगलेकर म.द., "ग्रामीण साहित्य विशेषांक", महाराष्ट्र साहित्य पत्रिका, 1980, पृ. 21.
16. यादव आनंद, उनि, पृ. 154.
17. मुलाटे वासुदेव, उनि, पृ. 154.
18. तत्रैव, पृ. 78.
19. हातकणंगलेकर म.द., उनि, पृ. 110.
20. यादव आनंद, उनि, पृ. 153.

xxxx